महाराष्ट्र शासन

क्रमांक : आंजिब-४९१७/प्र.क्र.७९/आस्था-१४,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
बांधकाम भवन, तळमजला,
२५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : ३१ जुलै, २०१७.

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद सर्व.

२) शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व.

विषय :- जिल्हा परिषद शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीबाबत.
संदर्भ :- शासनाचे समक्रमांकाचे दि. ७.७.२०१७ चे पत्र.

महोदय,

शासन निर्णय दि. २७.२.२०१७ अन्वये दिलेल्या निर्देशानूसार जिल्हयातील अपेक्षित व रिक्त जागांची स्थिती तालुकानिहाय व शाळानिहाय शक्यतो समप्रमाणात सुनिश्चित करण्यात यावी अशी कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

२. यापूर्वी संदर्भाधीन पत्रान्वये आंतरजिल्हा बदलीने रुजु झालेल्या शिक्षकांना कशी पदस्थापना देताना कोणते पद प्राधान्याने भरण्यात यावेत याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

अ) विशेष संवर्ग भाग -१ या संवर्गातील शिक्षकांना सर्वप्रथम प्राधान्याने समायोजनाने पदस्थापना देण्यात यावी. अशी पदस्थापना देताना पुर्ण जिल्हात ज्याठिकाणी बदलीने नियुक्ती देण्यास रिक्त जागा असतील (Clear Vacancy) त्या रिक्त जागेवर त्यांच्या सोईनूसार पदस्थापना देण्यात यावी.म्हणजेच या संवर्गाला पदस्थापना देताना दि.७/७/२०१७ रोजीच्या पत्रामध्ये नमूद भरती करण्यात येणारे पदाचा प्राधान्यक्रम विचारात घेऊ नये.

ब) विशेष संवर्ग भाग -२ या संवर्गातील शिक्षकांना पदस्थापना देताना, आंतरजिल्हा बदलीने संबधीत जिल्हात आलेल्या व्यक्तीचा जोडीदार त्याच जिल्हात कार्यरत असल्यास अशा आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांना दि.७/७/२०१७ च्या पत्रामध्ये नमूद सुचनेनुसार जी पदे प्राधान्याने भरणे आवश्यक आहे, अशा जागी त्यांना नियुक्ती द्यावी. या नियुक्तीने संबधीत शिक्षकाला त्यांच्या जोडीदारापासून ३० किमी. परिसरात नियुक्ती मिळत नसल्यास संबधित शिक्षक व त्याचा जोडीदार जी पदे प्राधान्याने भरणे आवश्यक आहे, अशा पदावर दोघांना नियुक्ती द्यावी.

क) सदर पत्र प्राप्त होण्यापूर्वीच विशेष संवर्ग भाग -१ व भाग-२ मधील शिक्षकांना पदस्थापना देण्यात आलेली असेल, तर त्या पदस्थापनेमध्ये कोणताही बदल करण्यात येवू नये.

ड) वरील सुचनांव्यतिरीक्त संदर्भाधीन पत्रातील अन्य सुचना कायम ठेवण्यात येत आहेत.

३. आंतरजिल्हा बदलीने रुजु झालेल्या शिक्षकांना पदस्थापना देताना, उपरोक्त निदेशानूसार कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

( प्रिं.शं. कांबळे)
अवर सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग.